# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- १६२१/२०२२

**अपिलार्थी, श्री.हरेश पुरुषोत्तम कलवानी,**
१२, देवसीविल्ला, कॉर्टर रोड नं. ३,
साई धाम बिल्डींग समोर, बोरवली पूर्व,
मुंबई ४०० ०६६.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा महसूल सहाय्यक,
उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांचे कार्यालय,
पवई चौक, उल्हासनगर कँप नं.३, जि.ठाणे ४२१ ००३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
उल्हासनगर,पवई चौक, उल्हासनगर कँप नं.३,
जि.ठाणे ४२१ ००३.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २५.०२.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १४.०२.२०२२ | -- | १२.०४.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. २६.०५.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती देण्यात आली नाही व सुनावणी घेण्यात आली नाही "* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २५.०२.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी श्री.गणेश वळवी, महसुल सहाय्यक, उपविभागीय अधिकारी कार्यालय, उल्हासनगर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

"

1) *Kindly provide me the conversacne deed verification of CD dt. 29.12.1992 certified true coyp issued by sdo of Ulhasnagar competent authority issued in favour of gr tolani.*
2) *(a) kindly also provide the relevant information pertaining to plot no.73 sheet no.40 (b0 Applicant Application (c) A.C.S.C. certified true copy (d) Appeal filed before Secretary including certified true copy A authorized Chief Settlement commissioner order copy. (e) Parawise statement (f) Vacant Possession of Plot (G) Sketch plan for plot no.73, sheet no.40 (h) Survey or memo (i) undertaking of Ghanshyam R.Tolani (j) secretary order 21/01/1992. "*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी तथा महसूल सहाय्यक, उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचे कार्यालय यांनी असा अहवाल सादर केला की, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे अवलोकन करण्यासाठी बोलाविले होते. परंतु ते माहिती स्विकारण्यास कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती देता आली नाही. उपलब्ध माहिती आताही आम्ही अपिलार्थी यांना देण्यास तयार आहोत.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा महसूल सहाय्यक, उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचे कार्यालय यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती विनामुल्य पुरवून त्याबाबतचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा महसूल सहाय्यक, उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचे कार्यालय यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी व माहिती पुरविल्याबाबतचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून आयोगासमोर सादर करावा.**

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१८.०३.२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता घेण्यात येईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२६ .

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ